लोकमत

# तृतीयपंथीयांनाही शिवभोजन थाळी योजनेतील एक केंद्र

नागपूर : सामाजिक न्याय विभागाच्या पुढाकाराने नागपुरात एका शिवभोजन थाळी केंद्राचे प्रातिनिधीक स्वरुपात संचालन करण्याची संधी जिल्हा प्रशासनाने तृतीयपंथीयांना देऊ केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात पा पडलेल्या बैठकीत या निर्णयावर तृतीयपंथीयांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत शिक्कामोर्तब करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सारथी ट्रस्टच्यावतीने निकुंज जोशी व इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 2 Jul 29, 2024
Powered by: erelego.com